# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2025

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -** (1) सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.
(2) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
(3) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(4) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
(5) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
(6) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या, आलेख काढावेत.
(7) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.
(8) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.
(9) पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**1. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा : [4]**

(1) भारत व ब्राझील या देशाची राजवट____________ प्रकाराची आहे.
(i) लष्करी (ii) साम्यवादी
(iii) प्रजासत्ताक (iv) अध्यक्षीय

(2) हिमालयामुळे उत्तरेकडून येणारे____________ वारे अडविले जातात.
(i) अतिथंड (ii) अतिउष्ण
(iii) उष्ण व कोरडे (iv) बाष्पयुक्त

(3) ब्राझील देशाची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने____________ व्यवसायावर अवलंबून आहे.
(i) प्राथमिक (ii) द्‌वितीयक
(iii) तृतीयक (iv) चतुर्थक

(4) ब्राझीलचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात____________ क्रमांक आहे.
(i) पाचवा (ii) सातवा
(iii) सहावा (iv) चौथा

**2. वेगळा घटक ओळखा : [4]**

(1) क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य :
(i) प्रश्नावली (ii) कॅमेरा
(iii) संगणक (iv) नोंदवही.

(2) ब्राझीलमधील नद्या :
(i) ॲमेझॉन (ii) पॅराग्वे
(iii) उरुग्वे (iv) गंगा

(3) प्राथमिक व्यवसाय :
(i) शेती (ii) खाणकाम
(iii) पर्यटन (iv) मत्स्य व्यवसाय

Target Publications

(4) वस्त्यांच्या केंद्रीकरणासाठी प्रमुख घटक
  (i) पाण्याची उपलब्धता  (ii) प्रतिकूल हवामान
  (iii) सुपीक जमीन  (iv) अनुकूल हवामान


**3. चूक की बरोबर ते सांगा ( कोणतेही चार ) : [4]**

(1) भारतातील लोकसंख्येत तरुणाईचे प्रमाण जास्त आहे.
(2) ब्राझील व भारत या दोन्ही देशात एकावेळी समान ऋतू असतात:
(3) मॅनॉस हे निग्रो व ॲमेझॉन या नदयांच्या संगमावरील बंदर आहे.
(4) ब्राझीलमध्ये लिंगगुणोत्तर जास्त आहे.
(5) ब्राझील हा वाघ व सिंह हे दोन्ही प्राणी असणारा जगातील एकमेव देश आहे.

**4. (अ) तुम्हास पुरविलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा व चिन्हांची सूची तयार करा (कोणतेही चार): [4]**

(1) पंपास  (2) माराजॉ बेट
(3) ब्राझीलची राजधानी  (4) पिको दी नेब्लीना
(5) पॅराना नदी  (6) मारान्हाओ राज्य

**(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार ): [4]**




**प्रश्न:**

(1) वरील नकाशा काय दर्शवितो ?
(2) भारतातील सर्वात दक्षिणेकडील टोक कोणते ?
(3) भारतातील पूर्व - पश्चिम अंतर किती आहे ?
(4) भारताची प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावरून निश्चित केली आहे ?
(5) भारताच्या पश्मिेला कोणता समुद्र आहे ?

Target Publications

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन ): [6]**

(1) हिमालयातील नद्या बारमाही वाहतात.

(2) ब्राझीलमध्ये उष्णकटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.

(3) ईशान्य ब्राझीलमध्ये वस्त्या विरळ आहेत.

(4) ब्राझीलमध्ये जलमार्गाचा विकास झालेला नाही.

**6. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : [6]**

**भारत - साक्षरता प्रमाण**
**(1981 ते 2016)**

| वर्षे | साक्षरता (टक्केवारी) |
|---|---|
| 1981 | 40.8 |
| 1991 | 48.2 |
| 2001 | 61.0 |
| 2011 | 69.3 |
| 2016 | 72.2 |

**प्रश्न:**


(1) वरील आलेख काय दर्शवितो?

(2) 1991 साली भारताची साक्षरता किती होती?

(3) 1991 ते 2001 या दशकात भारताच्या साक्षरतेत किती टक्क्यांनी वाढ झाली आहे?

**किंवा**

**(आ) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : [6]**




**प्रश्न:**

(1) प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या देशात जास्त आहे?

(2) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात कोणत्या देशात तृतीयक व्यवसायांचे योगदान जास्त आहे?

(3) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात द्‌वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या देशात जास्त आहे?

(4) ब्राझीलमध्ये कोणत्या व्यवसायात जास्त लोकसंख्या कार्यरत आहे?

(5) स्थूल आंतरदेशीय उत्पादनात तृतीयक व्यवसायातील ब्राझीलचे योगदान भारतापेक्षा कितीने जास्त आहे?

(6) भारतात तृतीयक क्षेत्रातील कार्यरत लोकसंख्येची टक्केवारी किती ?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन): [8]**

(1) क्षेत्रभेट म्हणजे काय? क्षेत्रभेटीची पूर्वतयारी कशी कराल?

(2) स्वातंत्र्योत्तर काळात भारत आणि ब्राझील या देशांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले?

(3) ब्राझील व भारताला कोणत्या पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागते?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2024

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -**
(i) सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
(iii) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(iv) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
(v) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहः** **[4]**

(1) पँटानल या दलदलीच्या प्रदेशात ____________ आढळतात.
(i) कोंडोर (ii) गुलाबी डॉल्फिन
(iii) महाकाय ॲनाकोंडा (iv) मकाव

(2) लोकसंख्येच्या वितरणावर ____________ हा घटक परिणाम करतो.
(i) प्राकृतिक रचना (ii) लिंग गुणोत्तर
(iii) साक्षरता (iv) आयुर्मान

(3) ब्राझीलमध्ये सर्वत्र सामान्यपणे ____________ वाहतूक आढळते.
(i) हवाई (ii) जल
(iii) रस्ते (iv) लोह

(4) क्षेत्रभेटी दरम्यान माहितीच्या संकलनासाठी ____________ या साहित्याची आवश्यकता असते.
(i) खुर्ची (ii) फळा
(iii) पाण्याची बाटली (iv) प्रश्नावली

**2. वेगळा घटक ओळखा :** **[4]**

(1) ब्राझीलच्या किनारपट्टीवरील राज्ये -
(i) रिओ दी जनेरीओ (ii) पराईबा
(iii) आमापा (iv) आक्रे

(2) भारतातील अतिजास्त पर्जन्याचा प्रदेश -
(i) पश्चिम राजस्थान (ii) पश्चिम घाट
(iii) मेघालय (iv) अरुणाचल प्रदेश

(3) ॲमेझॉन नदीच्या उपनद्या-
(i) पारू नदी (ii) पुरुस नदी
(iii) पॅराना नदी (iv) जुरूका नदी

Target Publications

(4) भारताच्या द्वीपकल्पीय प्रदेशात आढळणारे प्राणी -

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | गवा | (ii) | हरिण |
| (iii) | काळवीट | (iv) | याक |

**3. थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन):** **[4]**

(1) परतीचा मान्सून


(2) भारतातील पानझडी वने

(3) ब्राझीलची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**4. (अ) ब्रझीलच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही चार):** **[4]**

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर | (2) | साओ फ्रन्सिस्को नदी |
| (3) | माराजॉ बेट | (4) | पंपास |
| (5) | विषुववृत्त | (6) | ब्राझीलची राजधानी |

**(आ) खालील भारताच्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार):** **[4]**



**प्रश्न:**

(1) वरील नकाशाचे शीर्षक व उपशीर्षक काय आहे?

(2) कोणत्या भागात रस्ते मार्गाची घनता जास्त आहे?

(3) पश्चिम किनाऱ्यावरील दोन बंदरांची नावे लिहा.

(4) पोरबंदर ते सिल्चर महामार्गाचे नाव लिहा.

(5) कोलकाता जवळील बेटाचे नाव लिहा.

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन).** **[6]**

(1) हिमालयाच्या उंच भागात वनस्पतींची संख्या विरळ आढळते.

(2) ब्राझीलमध्ये उष्णकटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.

(3) किनाऱ्याकडून ब्राझीलच्या अंतर्गत प्रदेशात ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात जाताना मानवी वस्त्या अधिक विरळ होत जातात.

(4) भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे.

**6. (अ) खालील दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**भारत - नागरीकरणाचा कल**

**(1961 - 2011)**

| वर्षे | नागरीकरण % (टक्के) |
|---|---|
| 1961 | 18.0 |
| 1971 | 18.2 |
| 1981 | 23.3 |
| 1991 | 25.7 |
| 2001 | 27.8 |
| 2011 | 31.2 |

**प्रश्न:**

(1) 1961 साली नागरीकरण किती टक्के झाले होते?

(2) कोणत्या दशकात नागरीकरण सगळ्यात कमी होते?


(3) 1991 साली नागरीकरण किती टक्के झाले होते?

**किंवा**

**(आ) खालील आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**भारत आणि ब्राझील**

**राष्ट्रीय उत्पादनातील योगदान व गुंतलेली लोकसंख्या**






Target Publications

**प्रश्न:**

(1) आलेखात कोणती क्षेत्रे दर्शविलेली आहेत?

(2) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे?

(3) ब्राझीलच्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी किती आहे?

(4) दोन्ही पैकी कोणत्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्रातील योगदान कमी आहे?

(5) राष्ट्रीय उत्पादनात तृतीयक क्षेत्रातील योगदान कोणत्या देशाचे कमी आहे?

(6) ब्राझीलची 19% लोकसंख्या कोणत्या क्षेत्रात गुंतलेली आहे?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[8]**

(1) कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) ब्राझीलच्या किनारी प्रदेशाची माहिती लिहा.

(3) भारतातील लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2023

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -** (i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
(iii) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारत नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(iv) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
(v) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.
(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.
(ix) पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा.** **[4]**

(1) अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेटे ही ____________ आहेत.
(i) मुख्य भूभागापासून तुटलेला भूभाग (ii) प्रवाळ बेटे
(iii) ज्वालामुखीय बेटे (iv) खंडीय बेटे

(2) ब्राझील हा दक्षिण अमेरिका खंडातील ____________ लोकसंख्या असलेला देश आहे.
(i) कमी (ii) मध्यम
(iii) अत्यल्प (iv) सर्वांत जास्त

(3) वस्त्यांचे केंद्रीकरण ____________ या प्रमुख बाबींशी निगडित असते.
(i) समुद्रसान्निध्य (ii) मैदानी प्रदेश
(iii) पाण्याची उपलब्धता (iv) हवामान

(4) भारत व ब्राझील या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था ____________ प्रकारची आहे.
(i) अविकसित (ii) विकसित
(iii) विकसनशील (iv) अतिविकसित

**2. योग्य जोड्या जुळवा.** **[4]**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (1) | ट्रान्स ॲमेझोनियन मार्ग | (अ) | साग |
| (2) | काटेरी व झुडपी वने | (ब) | फुटबॉल |
| (3) | मैदानी प्रदेश | (क) | प्रमुख रस्ते मार्ग |
| (4) | ब्राझीलमधील लोकप्रिय खेळ | (ड) | खेजडी |
| | | (इ) | पंजाब |
| | | (ई) | क्रिकेट |

Target Publications

**3. थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन).** **[4]**

(1) क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य


(2) ब्राझीलची किनारपट्टी

(3) भारतातील खाणकाम

**4. (अ) भारताच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही चार).** **[4]**

(1) केंद्रशासित प्रदेश – दमण
(2) पश्चिम घाटातील जास्त पर्जन्याचा प्रदेश
(3) शीत वाळवंट
(4) उत्तरेकडील जास्त लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश
(5) कन्याकुमारी
(6) चिल्का सरोवर

**(आ) खालील ब्राझीलच्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार).** **[4]**




**प्रश्न:**

(1) ब्राझीलमधील प्रमुख नदी कोणती?

(2) ब्राझीलमधील मुख्य बेटे कोणते?

(3) उरुग्वे नदी कोणत्या दिशेकडे वाहते?

(4) साओ फ्रान्सिस्को नदी कोणत्या महासागरास येऊन मिळते?

(5) उत्तर अटलांटिक महासागराला मिळणाऱ्या कोणत्याही **एका** नदीचे नाव लिहा.

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन).** **[6]**

(1) ब्राझीलमधील लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

(2) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.

Target Publications

(3) हिमालयाच्या उंच भागात वनस्पींची संख्या विरळ आढळते.

(4) ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

**6. (अ) खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख तयार करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. [6]**

**सरासरी आयुर्मान - भारत**

| वर्षे | सरासरी आयुर्मान |
|---|---|
| 1980 | 54 |
| 1990 | 58 |
| 2000 | 63 |
| 2010 | 67 |
| 2016 | 68 |

**प्रश्न:**


(1) 1990 मध्ये सरासरी आयुर्मान किती आहे?

(2) कोणत्या दोन दशकात सरासरी आयुर्मानात समान वाढ झाली आहे?

(3) 1990 ते 2016 या काळात सरासरी आयुर्मानात कितीने वाढ झाली?

**किंवा**

**(आ) खालील आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. [6]**




Target Publications

**प्रश्न:**

(1) वरील आलेखाचा प्रकार कोणता?

(2) या आलेखात कोणत्या बाबी दर्शविल्या आहेत?

(3) कोणत्या वर्षी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाची टक्केवारी सारखी आहे?

(4) 2010 मध्ये भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न किती टक्के आहे?

(5) 2000 मध्ये कोणत्या देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाची टक्केवारी जास्त आहे?

(6) 2016 मध्ये भारत व ब्राझील यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात किती टक्क्यांचा फरक आहे?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन).** **[8]**

(1) भारत व ब्राझील या देशांतील नागरीकरणाबाबत तुलनात्मक आढावा घ्या.

(2) भारताची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

(3) क्षेत्रभेटी वेळी नदी प्रदूषण होवू नये म्हणून तुम्ही कोणते उपाय सुचवाल?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: जुलै 2022

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:** (i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
(iii) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारत/ब्राझील नकाशा-आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(iv) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
(v) प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत, पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**प्र.1. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा:** **[4]**

(1) भारताप्रमाणे ब्राझीलमध्ये सुध्दा ____________ आहेत.
(i) उंच पर्वत (ii) प्राचीन पठार
(iii) पश्चिम वाहिनी नद्या (iv) बर्फाच्छादित डोंगर

(2) हिमालयीन पायथ्यालगतच्या मिश्र वनामध्ये ____________ वृक्षाचे प्रमाण जास्त आहे.
(i) साल (ii) सुंद्री
(iii) खेजडी (iv) साग

(3) ब्राझीलमधील ____________ ही दक्षिण वाहिनी नदी जलवाहतुकीसाठी उपयुक्त आहे.
(i) पुरागुआकु (ii) परानिबा
(iii) पुरुस (iv) पॅराना

(4) नर्मदा नदीच्या खोऱ्यात ____________ वस्ती आढळते.
(i) रेषाकृती (ii) विखुरलेली
(iii) केंद्रित (iv) ताराकृती

**प्र.2. योग्य जोड्या जुळवा:** **[4]**

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| (1) | क्षेत्रभेट | (i) | सावो पावलो |
| (2) | भारताचे हवामान | (ii) | सांबा नृत्य |
| (3) | ब्राझील | (iii) | मान्सून |
| (4) | ब्राझीलमधील दाट लोकसंख्येचे राज्य | (iv) | साग |
| | | (v) | शिक्षकांच्या सूचनांचे पालन |

**प्र.3. टिपा लिहा: (कोणत्याही दोन).** **[4]**


(1) ब्राझीलमधील संदेशवहनाचा विकास.
(2) पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश
(3) ब्राझीलची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

Target Publications

प्र.4. (अ) तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या नकाशा-आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची तयार करा: (कोणतेही चार) [4]

(1) कर्कवृत्त
(2) कावेरी नदी
(3) अंदमान व निकोबार बेटे
(4) सर्वाधिक लिंगगुणोत्तर असलेले राज्य
(5) उत्तरेकडील कमी लोकसंख्या घनतेचे राज्य
(6) चिल्का सरोवर

(आ) पुढील ब्राझीलच्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा: (कोणतेही चार) [4]




प्रश्न:

(1) वरिल नकाशा काय दर्शवतो?
(2) नकाशात किती प्रमाणवेळा दर्शवलेल्या आहेत?
(3) ब्राझीलमधील कोणत्या भागातील वेळ इतर भागापेक्षा पुढे आहे?
(4) नकाशातील ठळक रेषा कार्य दर्शवते?
(5) पोंन्टो दो सेक्सास कोणत्या दिशेला आहे?

प्र.5. पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा: (कोणतेही दोन) [6]

(1) भारतात पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.
(2) ब्राझीलमध्ये उष्ण कटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.
(3) भारतामध्ये नागरीकरण वाढत आहे.
(4) ब्राझीलमधील वर्षावनांना जगाची फुफ्फुसे म्हणतात.

प्र.6. (अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा: [6]

**स्थूल आंतरदेशीय व्यापारातील हिस्सा**

**(१९८० ते २०१६)**

| वर्षे | १९८० | १९९० | २००० | २०१० | २०१६ |
|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय उत्पन्न % | १५ | १६ | २८ | ५० | ४० |

Target Publications

**प्रश्न:**

(1) वरील आलेख काय दर्शवतो?


(2) २०१० साली एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील व्यापाराचा हिस्सा किती होता?

(3) २०१० ते २०१६ या कालावधीत स्थूल आंतरदेशीय उत्पादनात किती टक्क्याने घट झाली?

**किंवा**

**(आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**साक्षरता प्रमाण :**




**प्रश्न:**

(1) वरील आलेख काय दर्शवतो?

(2) साक्षरता जास्त असलेला देश कोणता?

(3) २००१ मध्ये भारतापेक्षा ब्राझीलची साक्षरता किती टक्क्याने जास्त आहे?

(4) भारताची सर्वाधिक साक्षरता किती टक्के आहे?

(5) कोणत्या दशकात भारतातील साक्षरतेत सर्वाधिक वाढ झाली आहे?

(6) ब्राझीलमध्ये २०११ साली साक्षरता किती टक्के होती?

**प्र.7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा: (कोणतेही दोन)** **[8]**

(1) क्षेत्रभेटी दरम्यान शेतकऱ्यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करा.

(2) गंगा नदीचे खोरे आणि ॲमेझॉन नदीचे खोरे यांतील मानवी वस्तीबाबत फरक स्पष्ट करा.

(3) भारतातील प्रमुख वनप्रकार सांगा व काटेरी झुडपी वने याबद्दल सविस्तर माहिती लिहा.

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च 2022

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना: -** (i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
(iii) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारताच्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(iv) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(v) नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
(vi) प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.
(viii) शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही. रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या, आकृत्या आराखडे, नकाशा कार्य इत्यादीसाठी करावा.
(ix) पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**प्र.1. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा.** **[4]**

(1) भारताचे स्थान पृथ्वीवर ____________ गोलार्धात आहे.
(i) उत्तर व पूर्व (ii) दक्षिण व पश्चिम
(iii) उत्तर व पश्चिम (iv) दक्षिण व पूर्व

(2) ब्राझीलमध्ये आग्नेय, तसेच ईशान्य दिशेकडून येणाऱ्या ____________ वाऱ्यांपासून पाऊस पडतो.
(i) मान्सून वारे (ii) पूर्वीय (व्यापारी)
(iii) प्रतिव्यापारी (iv) आवर्त

(3) भारत व ब्राझील या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था ____________ प्रकारची आहे.
(i) अविकसित (ii) विकसित
(iii) अतिविकसित (iv) विकसनशील

(4) ब्राझीलचा सर्वाधिक भूभाग ____________.
(i) मैदानी प्रदेश आहे. (ii) उच्चभूमीचा आहे.
(iii) पर्वतीय आहे. (iv) विखंडित टेकड्यांचा आहे.

**प्र.2. योग्य जोड्या जुळवा.** **[4]**

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| (1) | क्षेत्रभेट | (i) | पर्यटन स्थळ |
| (2) | पिको दी नेब्लीना | (ii) | गोवा |
| (3) | सर्वाधिक नागरीकरण | (iii) | नमुना प्रश्नावली |
| (4) | रिओ दी जनेरिओ | (iv) | हिमाचल प्रदेश |
| | | (v) | ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर |

Target Publications

**प्र.3. एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतीही चार).** **[4]**

(1) ब्राझीलमधील पर्जन्यछायेच्या प्रदेशाला कोणत्या नावाने संबोधतात?

(2) ब्राझीलमधील लोकप्रिय खेळ कोणता?

(3) भारतातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वांत मोठे राज्य कोणते?

(4) भारताची प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावरून निश्चित केली जाते?

(5) भारतातील शेती ही मुख्यत्वे कोणत्या प्रकारची आहे?

**प्र.4. (अ) तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांना नावे द्या व चिन्हांची सूची द्या (कोणतेही चार).** **[4]**

(1) सिक्कीम

(2) लक्षद्वीप बेटे


(3) चेन्नई बंदर

(4) आसाममधील खनिज तेलक्षेत्र-दिग्बोई

(5) दक्षिण भारतातील सर्वाधिक लोकसंख्या घनतेचे राज्य

(6) कर्कवृत्त

**(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार).** **[4]**




Target Publications

**प्रश्न:**

(1) ब्राझीलमधील कोणतेही दोन वनप्रकार सांगा.

(2) नकाशात दर्शवलेले बेटे कोणते?

(3) नकाशात मगर कोठे आढळते?

(4) तामरिन हा प्राणी कोठे आढळून येतो?

(5) नकाशातील दक्षिणेकडील गवताळ प्रदेश कोणता?

**प्र.5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतीही दोन).** **[6]**

(1) भारतात पानझडी वने आढळतात.

(2) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.

(3) भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे.

(4) ब्राझीलच्या अंतर्गत भागातील खाणकाम व्यवसायाच्या विकासावर मर्यादा आल्या आहेत.

**प्र.6. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[6]**

**ब्राझील–नागरी लोकसंख्येची टक्केवारी**

**(1960 ते 2010)**

| वर्षे | नागरी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|
| 1960 | 47.1 |
| 1970 | 56.8 |
| 1980 | 66.0 |
| 1990 | 74.6 |
| 2000 | 81.5 |
| 2010 | 84.6 |

**प्रश्न:**

(1) वरील आलेख काय दर्शवतो?


(2) कोणत्या दशकात नागरीकरणाचा वेग कमी झालेला दिसतो?


(3) 1980 ते 1990 या दशकात नागरी लोकसंख्येत किती टक्क्याने वाढ झाली आहे?

**किंवा**

**(आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **[6]**

**आयुर्मान:**






**प्रश्न:**

(1) 2016 ला भारतीय सरासरी आयुर्मान किती?

(2) 1990 मध्ये ब्राझीलमधील सरासरी आयुर्मान भारतापेक्षा कितीने जास्त आहे?

(3) 1980 मधील भारतातील सरासरी आयुर्मान हे ब्राझीलमध्ये कोणत्या वर्षी होते?

(4) 2010 ते 2016 या कालावधीत सरासरी आयुर्मानातील वाढ कोणत्या देशात जास्त आहे?

(5) कोणत्या देशात सरासरी आयुर्मान जास्त आहे?

(6) 1960 मध्ये भारताचे आयुर्मान ब्राझीलपेक्षा किती वर्षांनी कमी होते?

**प्र.7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन).** **[8]**

(1) तुम्ही क्षेत्रभेटीत सहभागी होणार असाल, तर कशी तयारी कराल? वनक्षेत्रास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) भारत व ब्राझील या देशात हवामानाची तुलना करा.

(3) भारताच्या मैदानी प्रदेशाची वैशिष्ट्ये कोणती?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: डिसेंबर 2020

## भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:**
(i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
(iii) प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या ब्राझील नकाशा-आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
(iv) प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
(v) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलीचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत, पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**प्र.1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा:** **[4]**

(1) ब्राझील ____________ या नृत्यप्रकारासाठी प्रसिद्ध आहे.
(i) सांबा (ii) बिहू
(iii) भांगडा (iv) भरतनाट्यम्

(2) लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा जगातील ____________ क्रमांकाचा देश आहे.
(i) पहिल्या (ii) पाचव्या
(iii) सातव्या (iv) दुसऱ्या

(3) ॲमेझॉन ही जगातील एक मोठी नदी आहे. या नदीच्या मुखालगत ____________ .
(i) त्रिभुज प्रदेश आहे (ii) वितरिका आढळत नाहीत
(iii) विस्तीर्ण खाड्या आहेत (iv) मासेमारी व्यवसाय केला जातो

(4) भारतात ____________ राज्यात लोहमार्गाचे विरळ जाळे आढळते.
(i) उत्तर प्रदेश (ii) महाराष्ट्र
(iii) तमिळनाडू (iv) राजस्थान

**प्र.2. वेगळा घटक ओळखा:** **[4]**

(1) ब्राझील प्रमुख पिके :
(i) काकाओ (ii) कॉफी (iii) सोयाबीन (iv) ज्वारी

(2) क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश :
(i) भौगोलिक (ii) ऐतिहासिक (iii) मनोरंजन (iv) सांस्कृतिक

(3) ब्राझीलमधील वन प्रकार :
(i) काटेरी झुडपे (ii) सदाहरित वने (iii) हिमालयीन वने (iv) पानझडी वने

(4) भारतातील मीठ उत्पादक राज्य :
(i) गुजरात (ii) राजस्थान (iii) बिहार (iv) तमिळनाडू

Target Publications

**प्र.3. एका वाक्यात उत्तरे लिहा: (कोणतेही चार)** **[4]**

(1) ब्राझीलचा बहुतांश भाग कोणत्या गोलार्धात आहे?

(2) भारतातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य कोणते?

(3) ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर कोणते?

(4) लिंग-गुणोत्तर म्हणजे काय?

(5) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात कोणत्या स्वरूपाच्या वस्त्या आढळतात?

**प्र.4. (अ) ब्राझीलच्या नकाशा-आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा: (कोणतेही चार)** **[4]**

(1) पँटनाल
(2) काटेरी झुडपी वने
(3) पंपास (गवताळ प्रदेश)
(4) कॉफी उत्पादक प्रदेश
(5) उत्तरेकडील नागरी लोकसंख्या असलेले राज्य (आमापा)
(6) मॅनॉस बंदर

**(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा: (कोणतेही चार)** **[4]**




Target Publications

**प्रश्न:**

(1) वरील नकाशा काय दर्शवतो?

(2) उत्तर-दक्षिण महामार्ग कोणत्या दोन शहरांना जोडला आहे?

(3) पूर्व किनाऱ्यावरील प्रमुख दोन बंदरांची नावे लिहा.

(4) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वांत दक्षिणेकडील बंदर कोणते?

(5) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख बंदर.

**प्र.5. भौगोलिक कारणे लिहा: (कोणतीही दोन)** **[6]**

(1) ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

(2) भारताच्या पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.

(3) ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

(4) ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

**प्र.6. (अ) पुढे दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**भारताची ब्राझीलसोबत झालेली निर्यात**

**(निर्यात-दशलक्ष यू.एस. डॉलरमध्ये)**

| **वर्ष** | **२००८** | **२००९** | **२०१०** | **२०११** | **२०१२** |
|---|---|---|---|---|---|
| **निर्यात** | ३७०० | २२०० | ४२०० | ६१०० | ५००० |

**प्रश्न:**

(1) २००८ ला भारताची निर्यात किती होती?


(2) भारताची सर्वाधिक निर्यात कोणत्या वर्षी होती?

(3) २००९ ते २०११ या कालावधीत भारताच्या निर्यातीत किती दशलक्षाने वाढ झाली?

**किंवा**

**(आ) पुढे दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**वय आणि लिंग मनोरा (भारत 2016)**



**प्रश्नः**

(1) वरील आलेखाचे शीर्षक लिहा.

(2) सर्वाधिक लोकसंख्या कोणत्या वयोगटात आहे ?

(3) 'य'-अक्षावर दिलेल्या वयोगटातील वर्गांतर लिहा.

(4) ६० पेक्षा जास्त वयोगटातील स्त्री-पुरुष यांपैकी कोणाचे प्रमाण अधिक आहे?

(5) ५५ ते ५९ या वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण किती टक्के आहे?

(6) कोणत्या वयोगटानंतर लोकसंख्येत घट होताना दिसते?

**प्र.7. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहाः (कोणतेही दोन)** **[8]**

(1) साखर कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) भारताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घ्या.

(3) भारत व ब्राझीलमधील वनांचा ऱ्हास होण्याची प्रमुख कारणे कोणती?

Target Publications

# बोर्ड प्रश्नपत्रिका: मार्च २०१९
# भूगोल

**वेळ: 2 तास** **एकूण गुण: 40**

**सूचना:**
1. सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.
3. प्रश्न क्र. 4(अ) साठी पुरवण्यात आलेल्या ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
4. प्रश्न क्र. 6(अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
5. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
6. प्रश्नाची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या, आलेख काढावेत.
7. प्रश्नाची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.
8. शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही, रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या, आराखडे, नकाशा कार्य इत्यादींसाठी करावा.
9. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**1. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा:** **[4]**

1. ब्राझीलचा सर्वाधिक भूभाग .......... .
   (i) उच्चभूमीचा आहे (ii) मैदानी आहे
   (iii) पर्वतीय आहे (iv) विखंडित टेकड्यांचा आहे
2. भारताचे हवामान .......... प्रकारचे आहे.
   (i) दमट (ii) मान्सून
   (iii) विषुववृत्तीय (iv) शीत
3. साग हा वृक्ष प्रामुख्याने .......... वनात आढळतो.
   (i) समुद्रकाठ (ii) काटेरी
   (iii) पानझडी (iv) सूचीपर्णी
4. ब्राझील हा देश .......... च्या निर्यातीत अग्रेसर आहे.
   (i) खनिज तेल (ii) चहा
   (iii) बाजरी (iv) कॉफी

**2. वेगळा घटक ओळखा:** **[4]**

1. भारतातील राज्ये :
   (i) मध्यप्रदेश (ii) महाराष्ट्र
   (iii) मेघालय (iv) मारान्हाओ
2. भारतीय वनस्पती :
   (i) देवदार (ii) अंजन (iii) ऑर्किड (iv) वड
3. ब्रिक्स संघटनेतील सदस्य देश:
   (i) ब्राझील (ii) भारत (iii) चीन (iv) सौदी अरेबिया

4. लोकसंख्येचा वितरणावर परिणाम करणारे अनुकूल घटक:

| | |
|---|---|
| (i) सागरी सान्निध्य | (ii) रस्त्यांची कमतरता |
| (iii) सुपीक जमीन | (iv) नवीन शहरे आणि नगरे |


**3. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा व चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा (कोणतेही चार): [4]**

1. क्षेत्रभेटीदरम्यान पर्जन्यमानातील फरक वनस्पतीवरून समजत नाही.
2. गंगा नदीचा उगम यमनोत्री हिमनदीतून होतो.
3. ब्राझील हा देश प्रामुख्याने दक्षिण गोलार्धात आहे.
4. ब्राझीलच्या पश्चिम भागात दाट लोकवस्ती आहे.
5. भारताप्रमाणेच ब्राझीलची अर्थव्यवस्था सुद्धा मिश्र स्वरूपाची आहे.

**4. (अ) तुम्हांस पुरवलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या (कोणतेही चार): [4]**

| | |
|---|---|
| 1. माराजॉ बेट | 2. पिको दी नेब्लीना |
| 3. पँटनाल दलदलीचा प्रदेश | 4. अवर्षण चतुष्कोन |
| 5. कटिंगा | 6. सोनेरी तामरिन |

**(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार): [4]**



**प्रश्न:**

1. वरील नकाशा काय दर्शवतो?
2. नकाशातील पूर्व किनारपट्टीवरील कोणत्याही दोन विमानतळांची नावे लिहा.
3. नकाशात कोणत्या राज्यात लोहमार्ग आढळत नाहीत?
4. भारताच्या अति दक्षिणेकडील रेल्वेस्थानकाचे नाव लिहा.
5. मुंबई-मंगळूरू दरम्यान असलेले रेल्वेस्थानक कोणते?
6. नकाशातील सर्वांत उत्तरेकडील विमानतळाचे नाव लिहा.

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन):** **[6]**

1. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.
2. ब्राझीलमधील सदाहरित वर्षावनांना जगाची फुफ्फुसे म्हणतात.
3. ईशान्य ब्राझीलमध्ये वस्त्या विरळ आहेत.
4. उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गांचे जाळे विकसित झाले आहे.

**6. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**

**भारत–नागरीकरणाचा कल**
**(1961–2011)**


| वर्ष | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरीकरणाचा कल (टक्केवारी) | 18.0 | 18.2 | 23.3 | 25.7 | 27.8 | 31.2 |


**प्रश्न:**

1. वरील आकडेवारीतील वर्षांतर किती आहे?
2. कोणत्या दशकात नागरीकरणाचा कल सर्वांत कमी दिसतो?
3. कोणत्या दशकात नागरीकरणाचा कल सर्वांत जास्त आहे?

**किंवा**

**(आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:** **[6]**






**प्रश्न:**

1. वरील दोन्ही आलेख काय दर्शवतात?
2. कोणत्या देशात पुरुषांची संख्या जास्त आहे?
3. कोणत्या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या जास्त आहे?
4. 2001 नंतर कोणत्या देशाची स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढली आहे?
5. 1961 ला भारतातील दरहजारी स्त्रियांची संख्या किती होती?
6. कोणत्या देशात दरहजारी स्त्रियांची संख्या 1000 पेक्षा जास्त आहे?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन):** **[8]**

1. क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन तुम्ही कसे कराल?
2. भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांत स्थानासंदर्भातील कोणकोणत्या बाबी वेगळ्या आहेत?
3. ब्राझीलच्या हवामानावर परिणाम करणारे घटक लिहा.
4. भारत व ब्राझील या देशात चालणाऱ्या मासेमारी व्यवसायातील साम्य व फरक कोणते?